ISSN : 0974-0066

82

Vol-79 No.01
July - December : 2019

आज़ादी का
अमृत महोत्सव

# मध्य भारती

मानविकी एवं समाजविज्ञान की द्विभाषी शोध-पत्रिका

19-20

# मध्य भारती


## मानविकी एवं समाजविज्ञान की द्विभाषी शोध-पत्रिका

ISSN 0974-0066

UGC Care List, Group-C (Multi disciplinary), Sl.no.-15

(अंक-81, जुलाई-दिसम्बर, 2021)



**संरक्षक**

प्रो. नीलिमा गुप्ता

कुलपति

**प्रधान सम्पादक**

प्रो. अम्बिकादत्त शर्मा

**सम्पादक**

प्रो. भवतोष इन्द्रगुरू

प्रो. ब्रजेश कुमार श्रीवास्तव

डॉ. आशुतोष कुमार मिश्र

**प्रबन्ध सम्पादक**

डॉ. छबिल कुमार मेहेर



**डॉक्टर हरीसिंह गौर विश्वविद्यालय**

सागर (मध्यप्रदेश) - 470003

दूरभाष : (07582) 297133

ई-मेल : madhyabharti.2016@gmail.com

**सम्पादकीय परामर्श मण्डल**

- प्रो. ए.एन. शर्मा
- प्रो. आनंद प्रकाश त्रिपाठी
- प्रो. अशोक अहिरवार
- प्रो. दिवाकर सिंह राजपूत
- प्रो. डी.के. नेमा
- प्रो. नागेश दुबे
- प्रो. अनुपमा कौशिक
- डॉ. प्रकाश जोशी

# मध्य भारती

**मानविकी एवं समाजविज्ञान की द्विभाषी शोध-पत्रिका**

*अंक-81, जुलाई-दिसम्बर 2021*

ISSN 0974-0066 (पूर्व-समीक्षित अर्द्धवार्षिक शोध-पत्रिका)

डॉक्टर हरीसिंह गौर विश्वविद्यालय, सागर (म.प्र.)

UGC Care List, Group-C (Multi disciplinary), Sl.no.-15

*प्रकाशित रचनाओं के अभिमत से डॉक्टर हरीसिंह गौर विश्वविद्यालय, सागर या सम्पादकों की सहमति अनिवार्य नहीं है, तथा यहाँ प्रकाशित आलेखों 'प्लेजिरिज्म' (Plagiarism) सम्बन्धी शुचिता की जिम्मेदारी लेखकों की है।*

**सम्पादकीय पत्र व्यवहार :**

मध्य भारती

डॉक्टर हरीसिंह गौर विश्वविद्यालय

सागर - 470003 (म.प्र.)

Submit article / enquiry : editor.madhyabharti@gmail.com

*दूरभाष :* (07582) 297133

ई-मेल : madhyabharti.2016@gmail.com

*आवरण :* डॉ. छबिल कुमार मेहेर

**मुद्रण :**

अमन प्रकाशन

कटरा नमक मंडी, सागर (म.प्र.)

सदस्यता शुल्क

| | प्रति अंक | आजीवन |
|---|---|---|
| व्यक्तिगत | रु. 150/- | रु. 2000/- |
| संस्थागत | रु. 200/- | रु. 4000/- |

| | | |
|---|---|---|
| 22 | IMPORTANCE OF ETHICS, HUMAN AND CONSISTUTIONAL VALUES IN HIGHER EDUCATION | 103 |
| 23 | THE ROLE OF EDUCATION IN ECONOMIC DEVELOPMENT | 108 |
| 24 | PROMOTING QUALITY ACADEMIC RESEARCH | 112 |
| 25 | PROBLEMS AND STRATEGIES TOWARDS PROMOTION OF RESEARCH QUALITY AND ETHICS IN HIGHER EDUATIONAL INSTIUTIONS (HEIs) OF INDIA | 117 |
| 26 | IMPORTANCE OF ETHICS AND CONSTITUTIONAL VALUES IN HIGHER EDUCATION WITH REFERENCE TO NEP-2020-AN INTERPRETATIVE DISCOURSE | 120 |
| 27 | A CRITICAL ANALYSIS OF NEP 2020: CHALLENGES AND CRITICISM | 125 |
| 28 | THE ROLE OF TECHNICAL COMMUNICATION IN HIGHER EDUCATION | 128 |
| 29 | IMPORTANCE OF MOOC'S IN NEW EDUCATION POLICY | 131 |
| 30 | MORAL VALUES AND PROFESSIONAL ETHICS IN EDUCATION | 136 |
| 31 | यशवंतराव चव्हाणांचा स्त्री विषयक दृष्टिकोन | 142 |
| 32 | गोंड जमातीचा उगम व संस्कृती: एक ऐतिहासिक विश्लेषण | 147 |

# यशवंतराव चव्हाणांचा स्त्री विषयक दृष्टिकोन

**प्रा. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव** इतिहास विभाग, सहाय्यक प्राध्यापक मा. श्री. अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले जि. कोल्हापूर

**प्रस्तावना:**

यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी गरीब शेतकरी कुटुंबात झाला. गुणांच्या बळावरच त्यांनी गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगा ते राष्ट्रीय नेते अशी झेप घेतली. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी जन्मलेल्या यशवंतरावांना त्यांच्या आईने विठाबाईंनी निग्रहाने सांभाळले, घडवले. स्वातंत्र्यपूर्व काळात कराड येथे शालेय शिक्षण घेत असतानाच त्यांनी तिरंगा फडकवल्याबद्दल १८ महिने तुरुंगवास भोगला. वकिलीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नुकतेच लग्न झालेले असूनही इ.स. १९४२ च्या लढ्यात सातारा जिल्ह्यात ते आघाडीवर होते. या आंदोलनातही त्यांनी दोन वर्षांचा तुरुंगवास भोगला. ते इ.स. १९५६ मध्ये स्थापन झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्याचें पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली. तसेच १ मे, १९६० रोजी मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनही त्यांचीच निवड झाली.

त्यांचा जीवनप्रवास म्हणजे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषि औद्योगिक क्षेत्रातील उत्तुंग कर्तृत्त्वाचे प्रतिक आहे. त्यांच्या एकंदरित जडघडणीमध्ये त्यांच्या आई व पत्नीचा मोठा वाटा होता.

**उद्दिष्ट:**
यशवंतराव चव्हाणांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनावर प्रकाश टाकणे.

**आईचा गौरव:**
यशवंतरावांना घडवण्यामध्ये आई विठाबाई यांचे मोठे योगदान होते. माणुसकी हे यशवंतरावांचे मोठे बलस्थान होते. हा वारसा त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला होता. तसेच त्यांनी स्वाभिमानाने जगणे व जीवनाकडे सकारात्मकदृष्टीने बघणे शिकवले. यशवंतराव मुख्यमंत्री झाल्यानंतर एका सत्काराला उत्तर देताना आपल्या आई विषयी म्हणतात, "मला आपल्या या सगळ्या प्रेमाला पोहोचवण्याचे श्रेय माझ्या आईला आहे. आज दुनियेमध्ये काय चालले आहे याचे तिला फारसे ज्ञान नाही. तिची पुण्याई, तिचा साधेपणा, तिचे प्रेम, तिने शिकविलेले लहानपणचे चार दोन छोटेछोटे गुण हेच मला माझ्या जीवनामध्ये उपयोगी पडले आहेत."[१] आईप्रती त्यांना नितांत आदर होता. मुख्यमंत्री म्हणून मोठे पद मिळाल्यावरदेखील आईला त्या पदापेक्षाही मोठ्या उंचीवर पोहोचवणाऱ्या यशवंतरावांची महानता यातून दिसून येते. यशवंतरावांच्या लेखनांतून व भाषणांतून त्यांनी आईचे मोठेपण सांगितले आहे.

**कुटुंबातील इतर स्त्रिया:**

यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या भाऊ व भावजयीच्या मृत्युनंतर त्यांच्या तिन्ही मुलांचा सांभाळ पोटच्या मुलांप्रमाणे केला. त्यांची पुतणी सौ. लीलावाई बाबुराव काळे यांनी त्यांचे 'आमचे काका यशवंता' या लेखात लिहितात, "मी माझ्या मुलाबाळाला घेऊन त्यांच्याकडे वर्षातून एकदा तरी राहिल्याशिवाय त्यांचे समाधान होत नसे. माझ्या आजारपणात मला विश्रांतीसाठी घेऊन जात."[२] यशवंतरावांच्या भगिनी राधाअक्कांची भाऊबीज कधी चुकली नाही. यशवंतराव दिल्लीला होते तिथून कुणी कऱ्हाडला निघाला तर त्याला विनवून "एवढं अक्काला पोचवा " असे सांगत.[३] त्यांनी या कुटूंबातील स्त्रियांना मानसन्मान देऊन त्यांच्या

**निर्णयप्रक्रियेतील वेणूताईचा सहभाग:**

यशवंतराव लहान-मोठ्या प्रसंगात पत्नीवेणूताई यांच्याशी विचारविनिमय करत असत. सन १९४६ची निवडणूक यशवंतरांवानी जिंकली. तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांना पार्लमेंटरी सेक्रेटरी होण्याबाबत सुचवले. यशवंतरावानी तत्काळ निर्णय दिला नाही. या संबंधात त्यांनी आपल्या मित्रांशी चर्चा केली तसेच त्यांनी वेणूताईनांही काय निर्णय घ्यावा, असे विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या, "आजपर्यंत एवढे कठीण निर्णय घेतले तेव्हा तुमच्या मनात चलबिचल नव्हती मग आताच असे का?"[९] तसेच पंडित नेहरू यांनी दुरध्वनीवरून यशवंतरावांना सांगितले की, देशाचे संरक्षणमंत्रीपद स्वीकारण्यासाठी मी अपणास आमंत्रित करीत आहे. तेव्हा यशवंतरावांनी नम्रपणे सांगितले की, मला या संबंधात एका व्यक्तीशी बोलून निर्णय करावा लागेल. पंडितजींनी म्हटले की, "मी आपणास आमंत्रित करत आहे आता या नंतर आपणास कोणाशी बोलायचे आहे? यशवंतराव पटकन म्हणाले, "माझ्या पत्नीशी".[१०] यशवंतराव महत्त्वाचे निर्णयांमध्ये वेणूताईंना सामील करून घेत. श्री. ना. ढवळे यांनी या संदर्भात त्यांची आठवण लिहून ठेवली आहे. ते म्हणतात, घरगुती गोष्टींप्रमाणे तासंतास राजकारणावरही वेणूताईशी ते चर्चा करीत. आम्हाला याचं आश्चर्य वाटे. मामा एवढंच म्हणत. तिची राजकीय दृष्टी खुप मोठी आहे.[११]घरातील छोट्यामोठ्या गोष्टींसोबतच यशवंतराव मोठ्या गोष्टींच्या निर्णयातही वेणूताईला सामील करून घेत. ही गोष्ट मोठी क्रांतीकारी म्हणावी लागेल. निर्णय प्रक्रियेतील समावेश ही स्त्री सक्षमीकरणाची पूर्वअट मानली जाते. यशवंतरावांचे वेणूताईला निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे हे स्त्रीजातीचा दर्जा वाढवणारे होते.

'कृष्णाकाठ' या आपल्या आत्मचरित्रातील अर्पणपत्रिका ते आई व पत्नी यांना अर्पण करतात. आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला आकार आणि आशय देणारी माझी प्रिय पत्नी!" ही ग्रंथाची अर्पण पत्रिका आहे.[१२] आकार आणि आशय या दोन शब्दात त्यांचा आई व पत्नी यांच्या विषयींचा केवळ उदार दृष्टीकोन नव्हे तर त्यांच्या विषयी असलेले प्रेम व आदर दर्शवतात

**पत्नीची निरंतर स्मृती जपणारे यशवंतराव:**

वेणूताईचे निधन १ जून १९८३ रोजी झाले. त्यांनी राजकारणातले सारे यश आणि अपयश स्थितप्रज्ञासारखे पचवले, पण वेणूताईच्या मृत्युने ते पार खचून गेले.

यशवंतराव चव्हाणांनी इच्छापत्र लिहिले ते असे 'माझी पत्नी कै. वेणुताई हिचे स्मरणार्थ 'सार्वजनिक न्यास' निर्माण करणार आहे. तिने मला खाजगी व सार्वजनिक जीवनात अमोल साथ दिली आहे. त्यासाठी तिची आठवण जागती ठेवणे हा माझ्या जीवनातील उरलेला एकच आनंद आहे.' हा ट्रस्ट यशवंतरावांच्या पत्नीप्रेमाचे चिरंतर शिल्प आहे. पत्नीनिधनानंतरही तिच्या निरंतन स्मृती जपणाने यशवंतराव तिच्या मरणानंतरही तिला न्याय देण्याचा प्रयत्न करतात.[१३]

**इतर स्त्रियांबद्दलचा आदरभाव:**

पत्नी व कुटुंबातील इतर स्त्रियांसोबतचे त्यांचे वर्तन या स्त्रियांना न्याय देणारे होते. त्याप्रमाणे इतर कामानिमित्त भेटणाऱ्या स्त्रियांशी त्यांचा व्यवहारही स्त्रियांचा दर्जा वाढवणारा व त्यांना न्याय देणारा होता. एक म्हातारी फाटक्या लुगड्यात काही तरी गुंडाळून म्हातारपणामुळे कापत कापत यशवंतरावांच्या भेटीचा प्रयत्न करत होती. पोलीसांनी तिला जवळ जाऊ दिले नाही. यशवंतरावांनी हे पाहिले आणि तिला जवळ बोलावले व विचारले "का आली होतीस बाई"? "सर्व गाव यशवंताला नावाजतयं तवा त्याला भेटून हा हार द्यावा म्हणून आलिया." तिने फाटक्या लुगड्यातून तो हार बाहेर काढला व यशवंतरावांना दिला. त्यांनी तो हार घेतला व तिच्या गळयात घालून तिच्या पाया पडले व सौ. वेणूताईंना तिला जेवू घालायला सांगितले.[१४]

**राजकीय जीवनातील स्त्रिया:**

नागपूरचे असेंब्ली अधिवेशन संपत येऊ लागले होते. सर्व महिला आमदारांनी आपल्या निवासस्थानी यशवंतरावांना जेवायला बोलावले होते. जेवण दुपारी बारा वाजता ठेवले होते. त्यांचे काम साडेबारापर्यंत उरकले नाही व दुपारी त्यांना काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे व एक महत्त्वाचे निवेदन विधानसभेत द्यायचे होते. तेव्हा कन्नमवार म्हणाले, "आपण जेवण आटोपून एक वाजेपर्यंत असेंब्लीत येऊ कसे शकाल?" जेवणाच्या कार्यक्रमाला न गेल्यास काय हरकत आहे? तेव्हा यशवंतराव म्हणाले "नाही नाही हा महिलांचा कार्यक्रम आहे मला त्यांचा मान राखला पाहिजे मी जातो आणि लगेच परत येतो." यशवंतराव एक वाजण्यास तीन मिनीटे कमी असताना विधान सभेत आले तेव्हा कन्नमावार यांनी विचारले की, "जेवण येवढ्या लवकर आटोपले कसे?" ते म्हणाले "मी महिलांच्या बरोबर पानावर बसलो. घाईघाईने वरवर थोडा भात घेतला आणि क्षमा मागून लगेच येथे आलो.[१५] अशा तऱ्हेने यशवंतरावांनी कर्तव्यपुर्तीला छेद न देता सहकारी महिलांच्या विनंतीलादेखील मान दिला.

**सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया:**

शिवाजी सावंत हे 'पडत्या काळातील प्रतिनीधी' या आपल्या लेखात यशवंतरावांना भेटलेल्या स्त्रियांची माहिती देतात. बागलाण प्रांतातून थेट दिल्लीला गेलेल्या एका शेतकरी बाईला आपल्या बंगाल्यात दोन दिवस ठेऊन घेऊन तिला चोळी लुगडे देऊन तिच्या परतीचे तिकीट काढले जाते आणि तिच्यावरील अन्यायासाठी जेव्हा दिल्लीहून नासिक बागलाणच्या कलेक्टरला थेट फोनवर सूचना केंद्रीय मंत्री ना. यशवंतरावांच्याकडून मिळतात. मराठवाड्यात दौऱ्यावर असताना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याच्या गाडीला एक गावरान वृध्दा हात करून थांबवते, मुख्यमंत्री थांबतो तिची विचारपुस करतो. सण तोंडावर आला म्हणून तिच्या नातवंडांसाठी खाऊसाठी पैसे देतो. पुण्यात वृद्ध महिलेचा सत्कार असतो. एका वृद्धाला बालगंधर्व स्टेजच्या पायऱ्या चढणे शक्य होत नाही, त्यांच्या हस्ते हा सत्कार होत असतो. तो प्रमुख पाहुणाच स्टेजच्या पायऱ्या स्वतः उतरून वृद्धेला हार घालतो.[१६] यशवंतरावांचा नोकर सरवर त्यांची आठवण सांगतो की, त्याची आई आजारी असताना त्याला विमानाने आईच्या भेटीसाठी यशवंतराव व देणूताई यांनी पाठवले होते."[१७] यांवरून यशवंतरांना स्त्रियांप्रती कनव असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

यशवंतराव व वेणुताई यांच्या सहजीवनात छोट्या-मोठ्या प्रसंगांतून त्यांच्यातील जिव्हाळा आणि आपुलकी निदर्शनास येते. या सर्व प्रसंगांत यशवंतराव आपल्या पत्नीसोबत जीवाभावाची सखी प्रिय मैत्रीण म्हणून वारताना दिसतात. 'पायातली वहान पायातच ठेवली पाहिजे' या न्यायाने ते वागत नाहीत. तिच्या न्यायहक्कांसाठी ते सदैव जागृत होते. पत्नीचे न्यायहक्क जाणणारे व ते प्रत्यक्ष तिला बहाल करणारी दापंत्ये भारतीय समाजात फार थोडी आहेत. पत्नीविषयीचे त्यांचे हे वर्तन स्त्री जातीची प्रतिष्ठा वाढवणारे आहे.

कामानिमित्त भेटणाऱ्या या स्त्रियांच्या बाबतीत यशवंतराव त्यांचे धोरण त्यांची प्रतिष्ठा वाढवणारे होते. माणुकीचे होते. त्यांच्याप्रती त्यांना कनव होती. त्यांच्या भावनांच्याप्रती ते उदार आहेत. त्याचा ते आदर करतात. एकंदरीत स्त्रीजातीविषयी त्यांच्या ठायी कृतज्ञता आढळून येते.

**संदर्भ :**

1) सौ. निकमनीना, यशवंतरावांची मातृवंदना,(संपा. वाघ, रामनाथ,युगप्रवर्तक यशवंतराव), प्रकाशक, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, द्वितीय आवृत्ती २००८ पृ. ४३७.

2) सौ. काळे लीलाबाई बाबूराव, आमचे काका यशवंता,(संपा. बाबर सरोजिनी,मी पाहिलेले यशवंतराव),प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती, २००७, पृ. ४३१.

3) श्री.ढवळेना. वा, कऱ्हाडचे मामा, (संपा. बाबर सरोजिनी,मी पाहिलेले यशवंतराव),प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती २००७ पृ. ४४७.

4) शानेदिवान राजेखान, वेणुताई व यशवंतराव चव्हाण, मासिक 'मुराळी', मे,२०१२, पृ. २७.

5) डॉ. सौ. भांगे पाटील सुनीता, यशवंतरावचे पत्नीप्रेम,(संपा. वाघ रामनाथ, युगप्रवर्तक यशवंतराव), प्रकाशक : यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, द्वितीय आवृत्ती २००८, पृ. ४२८.

6) शानेदिवान राजेखान, वेणुताई: एक समर्पित जीवन, मासिक, मुराळी, जुलै,२०१२, पृ. ०९.

7) कन्नमवार सो.,ना. मा.यशवंतरावांच्या सहवासात आल्यानंतर,(संपा.बाबर सरोजिनी,मी पाहिलेले यशवंतराव),प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती, २००७, पृ. ९८.

8) प्राचार्य शिंदे राम, पत्नी परायण यशवंतराव,(संपा, वाघ रामनाथ,युगप्रवर्तक यशवंतराव), प्रकाशक,यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, द्वितीय आवृत्ती, २००८, पृ. ३९८.

9) शानेदिवान राजेखान, वेणुताई: एक समर्पित जीवन, मासिक, मुराळी, मे, २०१२. पृ. २९.

10) भावे मधुकर, यशवंतराव ते विलासराव, मनोविकास प्रकाशन, तृतीय आवृती, २००८, पृ. ४६.

11) श्री.ढवळे ना. वा.,कऱ्हाडचे मामा, (संपा. बाबर सरोजिनी, मी पाहिलेले यशवंतराव),प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती, २००७, पृ. ४४८.

12) डॉ. सौभांगे पाटील सुनीता, यशवंतरावचे पत्नी प्रेम, (संपा. वाघरामनाथ, युगप्रवर्तक यशवंतराव), प्रकाशक, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, द्वितीय आवृत्ती २००८, पृ. ४२७.

13) उपरोक्त, पृ. ४२८.

14) बागल भाई माधवराव,'यशवंतराव माझे गुरू', (संपा. बाबरसरोजिनी, मी पाहिलेले यशवंतराव),प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती, २००७, पृ. ७०.

15) कन्नमवारसो.ना.मा. यशवंतरावांच्या सहवासात आल्यानंतर,(संपा. बाबर सरोजिनी,मी पाहिलेले यशवंतराव),प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती, २००७, पृ. १००.

16) सावंत शिवाजी, पडत्या काळातीलप्रतिनिधी,(संपा. बाबर सरोजिनीमी पाहिलेले यशवंतराव,)प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती, २००७, पृ. १६६ व १६७.

17) सरवर, साहेब आमचे मायबाप, (संपा. बाबर सरोजिनी,मी पाहिलेले यशवंतराव), प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृती २००७ पृ. ४५५.